महायुद्धकाळात कुटुंब आणि समाज
यांच्या रक्षणासाठी, तसेच नेहमीसाठीही उपयुक्त ग्रंथ !

# अग्निहोत्र

मराठी (Marathi)


**संकलक**

हिंदु राष्ट्र-स्थापनेचा उद्घोष करणारे

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्त्या**

श्रीचित्शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ

सौ. प्रियांका सुयश गाडगीळ




## सनातन संस्था


**सनातनच्या ग्रंथसंपदेचे अद्वितीयत्व !**

सनातनच्या बहुतांशी ग्रंथांतील सुमारे २० टक्के लिखाण हे ‘सूक्ष्मातून प्राप्त झालेले दिव्य ज्ञान’ असून ते पृथ्वीवरील उपलब्ध ज्ञानाच्या तुलनेत अनोखे आहे !

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या अद्वितीय कार्याचा संक्षिप्त परिचय



१. अध्यात्मप्रसारार्थ 'सनातन संस्थे'ची स्थापना

२. शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी 'गुरुकृपायोग' या साधनामार्गाची निर्मिती : गुरुकृपायोगानुसार साधना करून २५.३.२०२३ पर्यंत १२३ साधक संत झाले, तर १,०८७ साधकांची संतत्वाच्या दिशेने वाटचाल चालू आहे.

३. आचारधर्मपालन, देवता, साधना, आदर्श राष्ट्ररचना, धर्मरक्षण आदी विविध विषयांवर विपुल ग्रंथ-निर्मिती

४. हिंदुत्ववादी नियतकालिक 'सनातन प्रभात'चे संस्थापक-संपादक

५. हिंदु राष्ट्राच्या (ईश्वरी राज्याच्या) स्थापनेचा उद्घोष (वर्ष १९९८)

६. 'हिंदु राष्ट्रा'च्या स्थापनेसाठी संत, संप्रदाय, हिंदुत्ववादी आदींचे संघटन आणि त्यांना दिशादर्शन !

**(संपूर्ण परिचयासाठी वाचा – www.Sanatan.org)**

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !**

स्थूल देह असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वां ठायी ॥
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ॥ – जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६

## सनातनच्या सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्त्या साधकांचे अद्वितीयत्व !



श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली मुकुल गाडगीळ



सौ. प्रियांका सुयश गाडगीळ

सूक्ष्म-ज्ञानप्राप्तकर्ते साधक पृथ्वीवर कुठेही उपलब्ध नसलेले अध्यात्मातील विविध विषयांवरील सखोल अध्यात्मशास्त्रीय ज्ञान सूक्ष्मातून मिळवतात. ते धार्मिक विधी, यज्ञयाग आदींचे सूक्ष्म-परीक्षणही करतात. ईश्वराकडून मिळणारे हे ज्ञान ग्रहण करण्यासाठी त्यांना आसुरी शक्तींच्या आक्रमणांनाही तोंड द्यावे लागते. असे असले, तरी गुरुकृपेच्या बळावर ते ही सेवा करतच आहेत.

---

## ग्रंथाची अनुक्रमणिका

**(काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)**


**१. तिसर्‍या महायुद्धाची भीषणता आणि त्यावरील उपाय ११**

**२. साधकांसह सामान्यजनांचा जीव वाचवण्यासाठी प.पू. डॉक्टरांनी सांगितलेले उपाय ११**

२ आ. अणूयुद्धामुळे होणार्‍या प्रदूषणापासून रक्षण होण्यासाठी करावयाचे उपाय ११

**३. अग्निहोत्र १२**

३ अ. अग्नीचे महत्त्व १२

३ आ. व्याख्या १३

३ इ. अग्निहोत्राचे प्रवर्तक १३

३ ई. परमसद्‌गुरु श्रीगजाननमहाराज यांच्या शिकवणीची मूल्ये १३

| | | | |
|---|---|---|---|
| | ३ उ. | पंचसाधनमार्गातील पहिले तत्त्व यज्ञ आणि अग्निहोत्र हे यज्ञाचे सर्वांत पहिले रूप | १४ |
| | ३ ऊ. | महत्त्व ३ ए. लाभ | १५ |
| | ३ ऐ. | अग्निहोत्राचे स्वरूप आणि प्रक्रिया | २० |
| | ३ ओ. | हवन | २० |
| | ३ औ. | अग्निहोत्ररूपी हवनातून ऊत्सर्जित होणारी तीन प्रकारची तेजस्विता | ४२ |
| | ३ अं. | परिणाम | ४३ |
| | ३ क. | अग्निहोत्रानंतर करावयाच्या कृती | ४५ |
| | ३ ख. | विभूती | ४५ |
| | ३ ग. | अग्निहोत्र आणि दीपाला प्रार्थना | ४७ |
| | ३ घ. | घराघरात अग्निहोत्र, यज्ञयाग आणि होम-हवनादी कर्म करणे आवश्यक | ४८ |
| | ३ च. | अग्निहोत्र हे कर्म साधना म्हणून केल्याने त्या त्या देवतांच्या स्तरावर होणारे लाभ | ४८ |
| | ३ छ. | अग्निहोत्र, होम, हवन, यज्ञ आणि याग | ५२ |
| **४.** | **वातावरण शुद्धीच्या संदर्भात अग्निहोत्र,यज्ञ, व्यष्टी साधना आणि समष्टी साधना यांचे महत्त्व** | | ५३ |
| 卐 | **परिशिष्ट** | | ५६ |
| 卐 | **प्रस्तुत ग्रंथाचे असामान्यत्व लक्षात घ्या !** | | ६० |
| 卐 | **संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती** | | ६१ |


---

**टीप :** ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.

## ग्रंथाचे मनोगत

### पुढच्या शेकडो पिढ्यांना उपयुक्त ठरणारी सनातनची ग्रंथमालिका ‘भावी आपत्काळातील संजीवनी’ !

‘पूर्वीच्या काळी व्यक्ती आजारी पडल्यावर आजीसारखी अनुभवी वडीलधारी मंडळी घरच्या घरीच त्या व्यक्तीवर औषधोपचार करत असत. त्यामुळे रुग्णाला प्रत्येक वेळी वैद्यांकडे जाण्याचा प्रसंग येत नसे. औषधोपचाराच्या या पद्धतीला कौतुकाने ‘आजीचा बटवा’ असे म्हणतात. ही सहजसोपी अन् पारंपरिक पद्धत आज जवळजवळ लुप्त झाली आहे. त्यामुळे आज थोडेसे जरी अस्वस्थ वाटू लागले, तरी व्यक्ती वैद्यांकडे जाते. सनातनच्या ‘भावी आपत्काळातील संजीवनी’ या मालिकेतील विविध ग्रंथांच्या उपयोगामुळे आता घरच्या घरीच आणि कोणताही दुष्परिणाम न होता सुलभतेने उपाय होऊ शकतील. या सर्व उपायपद्धती पुढच्या शेकडो पिढ्यांनाही उपयुक्त ठरणार आहेत. ‘हे उपाय श्रद्धेने करण्याची सुबुद्धी सर्वांना होवो आणि त्यासाठी सनातनचे हे ग्रंथ घरोघरी उपलब्ध होवोत’, अशी ईश्वरचरणी प्रार्थना !’ – (परात्पर गुरु) पांडे महाराज (३.१२.२०१७)

त्रिकालज्ञानी संतांनी सांगितलेलेच आहे की, येत्या आपत्कालामध्ये जगभरातील बरीच लोकसंख्या नष्ट होणार आहे. आता आपत्काळाला आरंभ झालाच आहे. आपत्काळात तिसरे महायुद्ध भडकेल. दुसऱ्या महायुद्धापेक्षा आता जगातील बहुतेक सर्वच राष्ट्रांकडे महासंहारक अशी अण्वस्त्रे आहेत. त्यामुळे ती एकमेकांविरुद्ध डागली जातील. या युद्धामध्ये वाचायचे असेल, तर त्यासाठी अण्वस्त्रे निकामी करणारा प्रभावी उपाय हवा, तसेच त्या अण्वस्त्रांपासून निघणारा किरणोत्सर्ग नष्ट करणाराही उपाय हवा. त्याकरिता स्थुलातील उपाय उपयोगी नाहीत; कारण अणुबाँब हा नेहमीच्या बाँबपेक्षा सूक्ष्म आहे. स्थूल (उदा. बाण मारून शत्रूचा नाश करणे), स्थूल अधिक सूक्ष्म (उदा. मंत्र म्हणून बाण मारणे), सूक्ष्मतर

(उदा. नुसते मंत्र म्हणणे) आणि सूक्ष्मतम (उदा. संतांचा संकल्प) असे अधिकाधिक प्रभावशाली टप्पे असतात. स्थुलापेक्षा सूक्ष्म हे कित्येक पटीने प्रभावी असते. त्यामुळे अणुबाँबसारख्या प्रभावी संहारकाचा किरणोत्सर्ग थोपवण्यासाठी सूक्ष्मातील काहीतरी करावे लागेल. त्यासाठी ऋषिमुनींनी यज्ञाचा प्रथमावतार असलेले 'अग्निहोत्र' करण्याचा उपाय सांगितला आहे. करण्यास अतिशय सोपा आणि अतिशय अल्प वेळात होणारा; पण प्रभावी असा सूक्ष्मातील परिणाम साधून देणारा हा उपाय आहे. त्यामुळे वातावरण चैतन्यदायी बनते आणि आपल्याभोवती संरक्षक-कवचही बनते. सामान्यांनी एवढे जरी केले, तरी पुरे आहे. याहूनही प्रभावी, म्हणजे सूक्ष्म उपाय, म्हणजे साधना करणे. साधनेने आत्मबल प्राप्त होते आणि आपल्या कार्याला बळ प्राप्त होते. सामान्य व्यक्तीने अग्निहोत्र करण्याने जो लाभ होईल, तो लाभ साधना करणाऱ्या आणि ६० टक्के आध्यात्मिक प्रगती झालेल्या साधकाने केलेल्या नुसत्या प्रार्थनेने साध्य होतो.

अग्निहोत्राचे महत्त्व, ते करण्याची पद्धत आणि त्याचा सूक्ष्मातील परिणाम समजावून देणारा असा हा ग्रंथ सादर करत आहोत. तो अभ्यासल्याने अग्निहोत्राचे, तसेच साधनेचेही महत्त्व सामान्यांना पटावे आणि त्यांना ते आचरणात आणता यावे, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**

## ग्रंथाच्या मुखपृष्ठावर अग्निहोत्र करणारा साधक सोवळ्यात न दाखवता नेहमीच्या वेशभूषेत दाखवण्याचे कारण

सर्वसाधारणतः यज्ञ म्हटले की, सोवळे-ओवळे पालन करणे, हे डोळ्यांसमोर येते. अग्निहोत्र हा यज्ञ बंधनमुक्त असल्यामुळे तो आजच्या आधुनिक युगात स्त्री, पुरुष, मुले असे कोणीही सहजपणे करू शकतो. हाच संदेश समाजाला देण्यासाठी आम्ही ग्रंथाच्या मुखपृष्ठावरसुद्धा अग्निहोत्र करणारा साधक सोवळ्यात न दाखवता नेहमीच्या वेशभूषेत दाखवला आहे.